# कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली

## जिल्हा - रत्नागिरी ४१५७१२.

Email: caet.aicrp.esaas@gmail.com


जा.क्र. कृअतंम/कृयंश/अभाससंप्र–कृसंक्षेश्रसु/गणनाकार/६९३/२०२५, दिनांक: 24 APR 2025

## -: नोटीस :-

'भारतातील कृषी यांत्रिकीकरणाच्या स्थितीचे मुल्यांकन व यंत्रे भाडे तत्त्वावर देण्याच्या संधी' हा सर्वेक्षण विषयी प्रकल्प, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली येथिल अखिल भारतीय समन्वीत संशोधन प्रकल्प – कृषि आणि संबंधित क्षेत्रातील श्रमविज्ञान आणि सुरक्षितता योजनेअतंर्गत राबविण्यात येत आहे. उपरोक्त सर्वेक्षणाचे काम रत्नागिरी, ठाणे आणि साऊथ गोवा या जिल्हयांमध्ये प्रत्येकी दहा याप्रमाणे एकूण तीस गावांमध्ये करण्याचे नियोजित आहे. उपरोक्त सर्वेक्षण कामासाठी 'गणनाकार' (Enumerator) च्या सेवा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दिनांक १३/०५/२०२५ पर्यत ईमेलद्वारे **(caet.aicrp.esaas@gmail.com)** किंवा टपालाने किंवा प्रत्यक्षपणे मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, डॉ. बासाकोकृवि, दापोली, जिल्हा: रत्नागिरी यांच्या नावे सादर करावेत. तसेच सादर करण्यात येणाऱ्या लखोटयावर प्रकल्पाचे नाव व पदाचे नाव नमुद करण्यात यावे. उपरोक्त अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

शैक्षणिक अर्हता :

- पदवीधर

नियम व अटी :

१. 'गणनाकार' म्हणून सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी उमेदवारास सर्वेक्षण कामाचा अनुभव असलेल्या कंत्राटी कृषी कर्मचारी / ग्रामपंचायत कर्मचारी इ. यांना प्राध्यान्य देण्यात येईल.

२. 'गणनाकार' चे वय मर्यादा – खुल्या प्रवर्गातील उमेदवार ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (अ.ज./अ.जा. आणि इतर मागासवर्गीय यांना शासकीय नियमानुसार वय मर्यादेमध्ये शिथिलता राहील) तसेच उमेदवारांने वयाचा पुरावा अर्जासोबत सादर करावा.

३. गणनाकाराच्या निवडीसाठी शैक्षणिक अर्हता किमान पदवीधर असावी.

४. आवश्यकतेनुसार जिल्हयासाठी एक किंवा त्यापेक्षा अधिक 'गणनाकार' च्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतील.

५. उमदेवारांची निवड पात्र उमेदवारांमधून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राध्यान्य' ;पितेज बवउम पितेज `मतअमक्क तत्त्वावर करण्यात येईल.

६. सर्वेक्षण करण्यासाठी शक्यतो संबधित तालुक्यातील /जिल्हयातील उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. संबंधित तालुक्यातील /जिल्हातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर ठिकाणचा उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

७. पात्र उमेदवारांच्या अर्जाची पडताळणी समितीमार्फत करण्यात येईल.

८. उमेदवारांची नियुक्ती केवळ सर्वेक्षण पूर्ण होईपर्यंत करण्यात येईल.

९. उमेदवारांना सर्वेक्षण कामाचे मानधन दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार देण्यात येईल.

१०. मानधनाव्यतीरिक्त गणनाकारा यांना प्रवास किंवा इतर भत्ते दिले जाणार नाहीत.

११. सर्वेक्षण कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी निवडलेल्या गणनाकारांना प्रशिक्षण दिले जाईल. तसेच फक्त प्रशिक्षण दिवसाचा प्रवास भत्ता अदा करण्यात येईल.

१२. निवडलेल्या गणनाकाराने मध्येच काम सोडले तर प्रतिक्षा यादीतील पुढच्या उमेदवारास सदर काम दिले जाईल.

१३. तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक दिलेल्या गणनाकार उमेदवारास सर्वोच्य न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एमएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीच्या कालावधीनंतर डॉ. बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी नोकरी मिळण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

**प्रकल्पाचे नाव: भारतातील कृषी यांत्रिकीकरणाच्या स्थितीचे मुल्यांकन व यंत्रे भाडे तत्त्वावर देण्याच्या संधी**

**कंत्राटी पदाचे नाव: गणनाकार**

**कामाचे ठिकाण : रत्नागिरी / ठाणे / साऊथ गोवा**

**कामाचा तपशिल:**

| अ.क्र | तपशिल | मानधन (दर) रु. |
|---|---|---|
| १ | प्रत्येक गावाची व तेथिल शेतकऱ्यांची (२४ शेतकरी) माहिती संकलित करुन मोबाईल Android App द्वारे ऑनलाईन भरणे.<br>(एका जिल्हयातील एकूण १० गावाचे मानधन रु. २४०००/–) | २४००/– प्रती गाव |

सहयोगी अधिष्ठाता
कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
डॉ.बासाकोकृवि, दापोली, जिल्हा: रत्नागिरी

प्रत:

१. मा. तहसिलदार, तालुका ................ जिल्हा: ....................

२. .....................ग्रामपंचायत कार्यालय, तालुका: .......................... जिल्हा: ....................

# नमुना अर्ज

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव :–

२. दूरध्वनी क्रमांक :–

३. अर्ज केलेल्या कंत्राटी पदाचे नांव :–

४. प्रकल्पाचे नाव :–

५. सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता :–

६. कामाचे ठिकाण ज्याकरीता अर्ज केलेला आहे :– **रत्नागिरी जिल्हा/ ठाणे जिल्हा/ साऊथ गोवा**

७. जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :–

८. अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकाच्यावेळी असलेले वय :– वर्षे महिने दिवस

९. धर्म आणि जात:–

१०. मागासवर्गीय असल्यास जात/प्रवर्ग :– अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. / इ.मा.व. / वि.मा.प्र. :–

११. शैक्षणिक अर्हता :–

| अ. क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | बोर्ड / विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१२. अनुभव :–

| अ. क्र. | नियुक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | पासून (दिनांक) | पर्यन्त (दिनांक) | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१३. उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची माहिती

## प्र मा ण प त्र

मी असे प्रमाणित करतो/ करते की, मी वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास त्या माहिती आधारे मिळवलेली नोकरी गमावण्यास बांधील राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(अर्जदाराची नाव/सही)

ठिकाण :

दिनांक :